लोकमत

# फिनोलेक्स, मुकुल माधव व हिंदूजा फाउंडेशनतर्फे चक्रीवादळग्रस्तांना ५० लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** फिनोलेक्स पाइप्स, मुकुल माधव फाउंडेशन व हिंदूजा फाउंडेशनतर्फे रत्नागिरी, रायगडमध्ये चक्रीवादळग्रस्तांना ५० लाखांची मदत करण्यात आली. काही दिवसांपूर्वी आलेल्या 'निसर्ग' चक्रीवादळामुळे कोकणातील अनेक गावांना मोठा तडाखा बसला होता. अनेकांचे संसार उघड्यावर पडले होते. या दोन जिल्ह्यांतील ३३३ कुटुंबांना उभे करण्याचे काम मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून झाले आहे.

> निसर्ग चक्रीवादळामुळे कोकणातील अनेक गावांना मोठा फटका बसला आहे. त्यांना काहीसा दिलासा देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. ज्यांना काहीच आधार नाही, अशा गरजू कुटुंबांना ही मदत स्थानिक प्रशासनाच्या मदतीने देण्यात आली आहे. यापुढेही गरजू कुटुंबांना फाउंडेशनच्या वतीने मदत केली जाणार आहे.
>
> **- रितू प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त**

> रितू छाब्रिया यांनी सामाजिक जाणिवेतून फिनोलेक्स पाइप्स, मुकुल माधव फाउंडेशन आणि हिंदूजा फाउंडेशनच्या माध्यमातून जवळपास रायगडमधील २१३ कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. ज्यांचे घर पडले आहे, लाइट्स गेल्यात त्यांना पत्रे, सोलर लाइट व अन्य साहित्य देण्यात आले आहे. या मदतीसाठी रायगड जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून सर्वांचे ऋण व्यक्त करते.
>
> **- अदिती तटकरे, पालकमंत्री, रायगड**

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व मंडणगड तालुक्यातील १२०, तर रायगड जिल्ह्यातील ताळा, श्रीवर्धन व दिवेआगार या तालुक्यातील २१३ कुटुंबांना घरावरील पत्रे, सोलर लाइट, ब्लँकेट, धान्य आदी वस्तू देण्यात आल्या. प्रत्येकी २० पत्रे याप्रमाणे जवळपास ६ हजार पत्रे, मोबाइल चार्जरची सोय असणारे सोलर दिवे आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे.

पहिल्या टप्प्यात रत्नागिरी जिल्ह्यातील अत्यंत गरीब कुटुंबांना मदत दिल्यानंतर, रायगडच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धन व ताळा तालुक्यातील निराधार कुटुंबांना मदत करण्याचे आवाहन केले. त्यानुसार या दोन्ही तालुक्यांत ११३ व दिवेआगारमधील १०० कुटुंबांना दुसऱ्या टप्प्यात मदत देण्यात आली.